# प्रेसनोट दि. २१.०३.२०२३

लोकसेवक अकबर खताळसो हवालदार, वय ५३ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली. रा. रूम नं. १०२, वर्धमान इमरड आपार्टमेंट, अल्फान्सो स्कुल जवळ एम.आय.डी.सी रोड, मिरज, जि. सांगली यांनी ४०,०००/- रुपये लाच मागणी केल्याने त्यांचे विरुद्ध सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचा भाऊ व इतर दोन इसम यांचे विरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांच्या भावास अटक न करता नोटीस देवुन सोडण्यासाठी तसेच तपासात मदत करण्यासाठी लोकसेवक अकबर खताळसो हवालदार, वय ५३ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली. यांनी तक्रारदार यांचेकडे ६०,०००/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१७.०१.२०२३ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १७.०१.२०२३, दिनांक २०.०१.२०२३, दिनांक २२.०१.२०२३, दिनांक २४.०१.२०२३, दिनांक ३१.०१.२०२३ रोजी व दि.०१.०२.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये लोकसेवक अकबर हवालदार यांनी तक्रारदार व त्यांचे भावाशी गुन्ह्या संदर्भात चर्चा करून दि. ३१.०१.२०२३ रोजी व दि. ०१.०२.२०२३ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांचेकडे त्यांचे भावा विरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये भावास अटक न करता नोटीस देवुन सोडण्यासाठी तसेच तपासात मदत करण्यासाठी प्रत्येक आरोपी करीता २०,०००/- रूपये प्रमाणे एकुण ६०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती ५०,०००/- रूपये व त्यानंतर ४०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्या अनुषंगाने लोकसेवक अकबर खताळसो हवालदार, वय ५३ वर्षे, व्यवसाय- पोलीस उप निरीक्षक वर्ग-३, सांगली, नेमणुक- विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली. रा. रूम नं. १०२, वर्धमान इम्रड आपार्टमेंट, अल्फान्सो स्कुल जवळ एम.आय.डी.सी रोड, मिरज, जि. सांगली , यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री संदीप पाटील, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार धनंजय खाडे, प्रितम चौगुले, रविंद्र धुमाळ, सलीम मकानदार, अजित पाटील, चंद्रकांत जाधव, ऋषीकेश बडणीकर, रामहरी वाघमोडे, सिमा माने, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(विनायक भिलारे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,सांगली

Dy. Supdt. of Police, Anti Corruption Bureau, SANGLI.

Scanned with OKEN Scanner